अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com ▪ शुक्रवार, दि. २ फेब्रुवारी २०२४ ▪ ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : १२४ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

आजपासून भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यात दुसरा कसोटी सामना

✔ **विशाखापट्टणम** : पहिल्या कसोटी सामन्यात इंग्लंडने भारताचा २८ धावांनी पराभव केला होता. आता भारत आणि इंग्लंड यांच्यातील दुसरा कसोटी सामना आज २ फेब्रुवारी रोजी विशाखापट्टनम येथे होणार आहे.

दुसऱ्या कसोटी सामन्यासाठी इंग्लंडच्या संघाने प्लेईंग ११ ची घोषणा केली आहे. इंग्लंडच्या संघात दोन बदल करण्यात आले आहे. अनुभवी वेगवान

गोलंदाज जेम्स अँडरसन याचं कमबॅक झालेय. तर फिरकी गोलंदाज शोएब बशीर याचं पदार्पण होणार आहे. पहिल्या कसोटी सामन्यात इंग्लंडने भारताविरुद्ध २८ धावांनी विजय मिळवला होता.

इंग्लंडचा संघ : जॅक क्रॉली, बेन डकेट, ओली पोप, जो रूट, जॉनी बेयरस्टो, बेन स्टोक्स (कर्णधार), बेन फोक्स (विकेटकीपर), रेहान अहमद, टॉम हार्टले, शोएब बशीर आणि जेम्स अँडरसन.

भारतीय संघ : रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, यशस्वी जयसवाल, श्रेयस अय्यर, केएस भरत (विकेटकीपर), ध्रुव जुरेल (विकेटकीपर), रविचंद्रन अश्विन, अक्षर पटेल, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, जसप्रीत बुमराह (उपकर्णधार), आवेश खान, रजत पाटीदार, सरफराज खान, वॉशिंगटन सुंदर आणि सौरभ कुमार.

गरिबीने छळले, हाल सहन केले, त्रागातून तिचे आयुष्य संपवले

होटगी जवळच्या यत्नाळ गावात पतीचे क्रौर्य; वायरने गळा आवळून पत्नीचा खून

✔ सुराज्य/दक्षिण सोलापूर

कौटुंबिक स्थिती अत्यंत हलाखीची. गरिबी सहन होत नव्हती. सातत्याने ती छळायची. तरीही सारे काही सहन केले. सोन्यासारखी दोन मुले-बाळे झाली. त्यातच आनंद मानून ती गरिबीवर मात करायची. गरिबीमुळे घर भागत नव्हते. पैसे आण म्हणून पती त्रास द्यायचा. माहेरची मंडळी मदत करायचे. तरीही संसाराला पुरत नव्हते. यातूनच मानसिक त्रास असह्य झाल्याने पतीकडून सतत भांडणे व्हायची. हा त्रास तिने सतत भोगला पण बुधवारचा दिवस तिच्यासाठी अखेर काळ ठरला.कडाक्याच्या भांडणातून पतीने पत्नीचा वायरने गळा आवळून खून केला आणि २० वर्षांचा दोघांचा संसार मोडून पडला.हा करूण प्रसंग आहे,दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगीजवळच्या यत्नाळ गावातील. रेखा शरणबसप्पा हिरोळे (वय ३४) असे मृत पत्नीचे नाव असून पती शरणबसप्पा महादेव हिरोळे (वय ४० वर्ष, रा.यत्नाळ, दक्षिण सोलापूर) याला वळसंग पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

रेखा शरणबसप्पा हिरोळे

हिरोळे कुटुंबाची परिस्थिती बेताची होती. आर्थिक चणचण भासत होती. संसाराचा गाडा हाकण्यासाठी पैसे कमी पडत होते. यामुळे पती - पत्नीत सतत भांडणे व्हायची.तिला सतत मारहाण होत होती. पैशांसाठी जावई शरणबसप्पा हा सतत सासू - सासऱ्यांकडे पत्नी मार्फत तगादा लावायचा. सासू सासरे दिंडोरे गावात राहत होते. मृत रेखा हिचा भाऊ ओमान या देशात नोकरीला आहे. सासू सासरे नेहमी पाच ते दहा हजार रुपयांची मदत रेखा आणि शरणबसप्पा यांना करत होते. मेहुणा ओमान देशातून बहिणीला आर्थिक मदत करत होता. शरणबसप्पा हा रोजंदारीवर मजुरीचे काम करत होता. त्यामुळे पती-पत्नीत पैशांच्या कारणावरून सतत कुरबुर होत होती. संध्याकाळी स्वतःहून सोलापूर शहरातील एमआयडीसी पोलीस ठाण्यात हजर होऊन त्याने खून केल्याची कबुली दिली. एमआयडीसी पोलिसांनी हद्द पाहून विडी घरकुल चौकी कुंभारी गावाकडे पाठवून दिले. त्यानंतर वळसंग पोलिसांनी आरोपी शरणबसप्पा याला ताब्यात घेऊन घटनास्थळी धाव घेतली. रात्री नऊ वाजल्यापासून गुरुवारी पहाटेपर्यंत पोलिसांनी पंचनामा केला आणि मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केला व रेखाच्या आई वडिलांना घटनेची माहिती दिली.

गुरूवारी शरणबसप्पाला कोर्टात हजर केल्यानंतर ३फेब्रुवारीपर्यंत त्याला पोलीस कोठडी देण्यात आली आहे. त्याच्यावर ३०२ अन्वये खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास वळसंग पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल सनगले हे करत आहेत.अक्कलकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी विलास यामावार यांनीही घटनास्थळी भेट दिली.

गावभर फिरला...

शरणबसप्पा आणि रेखा यांच्यात बुधवारी सकाळी कडाक्याचे भांडण झाले होते. शरणबसप्पा हा सकाळीच सात वर्षांच्या मुलीला बहिणीकडे सोडून आला. दुपारी पुन्हा रेखा आणि शरणबसप्पा यांच्यात जोरदार भांडण झाले. रागाच्या भरात शरणबसप्पा याने रेखा हिचा इलेक्ट्रिक वायरने गळा आवळला. सुटका होऊ नये यासाठी वायरला पिळा मारल्या. त्यातच तिचा तडफडून जीव गेला. पत्नीला संपवल्यानंतर शरणबसप्पा याने मृतदेहावर चादर घातली आणि घरातील पंखा फास्ट लावला. बाहेरून कडी लावून गावभर फिरला.

मालट्रकच्या धडकेने दूध उत्पादक शेतकरी जागीच ठार

✔ **सांगोला** : भरधाव वेगाने जाणाऱ्या मालट्रकने डेअरीला दूध घालून घराकडे जाणाऱ्या दुचाकीला पाठीमागून जोराची धडक दिली. या अपघातात जखमी झालेला दूध उत्पादक शेतकरी जागीच ठार झाला. हा अपघात बुधवारी रात्री ७:४५ च्या सुमारास सांगोला-जत रोडवरील लोणविरे फाट्याजवळ घडला.

चंद्रकांत बजरंग गायकवाड (५०, रा. लोणविरे, ता. सांगोला) असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे. याबाबत सुनील महादेव पाटील यांनी फिर्याद दिली. पोलिसांनी चालक रावसाहेब मुरलीधर (कुटे, रा. जिवाचीवाडी, ता. केज, जि. बीड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. लोणविरे येथील मयत चंद्रकांत गायकवाड हे ३१ जानेवारी रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास दूध घालण्यासाठी एमएच ४५ /एम ७७३० या दुचाकीवरून दूध डेअरीवर आले होते. दूध घालून दुचाकीवरून सोनंद-सांगोला रस्त्याने घराकडे निघाले असता रात्री ७:४५ च्या सुमारास सोनंदकडून भरधाव वेगाने येणाऱ्या एमएच १२ /युएम ७५२२ मालट्रकने पाठीमागून त्यांच्या दुचाकीस लोणविरे फाट्याजवळ धडक दिली.

टिकेकरवाडी येथे रेल्वेखाली आत्महत्या

✔ **सोलापूर** : टिकेकरवाडी ते सोलापूर या लोहमार्गावर धावत्या रेल्वेखाली सिध्दाराम शिवयोगी हसनपुरे (वय ५२रा.एजी पाटील नगर, जुळे सोलापूर) या इसमाने आत्महत्या केली.

गुरुवारी टिकेकरवाडी ते सोलापूर या लोहमार्गावर त्याचा मृतदेह आढळला. मयत सिध्दाराम हसनपुरे हा मजुरीचे काम करीत असून त्याच्या पश्चात पत्नी आणि २ मुले असा परिवार आहे. तो गेल्या दोन दिवसापासून घरातून गेला होता. या घटनेची नोंद विजापूर नाका पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार बहिर्जी पुढील तपास करीत आहेत.

कॅरीबॅग सापडली तर गुन्हे दाखल होणार; दुकानदार, भाजीविक्रेत्यांना इशारा

✔ सुराज्य/सोलापूर

महापालिका पुन्हा कॅरीबॅग आणि थर्माकॉल विक्रेते, वापर करणाऱ्या मंडळींवर कारवाई करणार आहे. आरोग्य निरीक्षकांना दंडात्मक कारवाईचे उद्दीष्ट देण्यात आले आहे. कॅरीबॅग, थर्माकॉल सापडले तर दुकानदार, भाजी विक्रेते, फळविक्रेते यांच्यावर गुन्हे दाखल होतील. कॅरीबॅग विक्रेत्यांचा शोध येऊन पोलीस कारवाई होईल, असा इशारा मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार यांनी गुरुवारी दिला.

बिराजदार म्हणाले, महापालिका आयुक्त शीतल

तेली उगले यांनी प्लास्टिक बंदी कारवाईबाबत नुकतीच आढावा बैठक घेतली. शहरात वर्षभरात १०४ जणांवर कारवाई झाली आहे. या १०४ जणांकडून पाच लाख ५० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. शुक्रवारपासून पुन्हा शहरात कारवाई सुरू होणार आहे.

दुकानदारांकडे कॅरीबॅग सापडली तर ५ हजार रुपये दंड होतो. अनेकजण हा दंड भरून पुन्हा कॅरीबॅग वापर करीत असल्याचे दिसून येते. मनपा आयुक्तांनी अशा आस्थापनांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. पालिकेच्या आरोग्य निरीक्षकांनी मंगल कार्यालये, दुकाने, भाजी विक्रेते, फळविक्रेते अशा विविध आस्थापनांची तपासणी करावी. या तपासणीचा अहवाल उपायुक्तांना सादर करावा. यात हलगर्जीपणा केल्यास आरोग्य निरीक्षकांवर कारवाईचा इशारा बिराजदार यांनी दिला.

अणदूर येथे दोन गटात कुऱ्हाड आणि रॉडने मारहाण

महिलेसह तिघे जखमी

✔ **सोलापूर** : अणदूर (ता. तुळजापूर) येथे नातेवाईकाचे भांडण सोडविण्याच्या कारणावरून दोन गटात कुऱ्हाड, दगड लोखंडी रॉड आणि लाथाबुक्क्याने झालेल्या मारहाणीत महिलेसह तिघेजण जखमी झाले.

ही घटना बुधवारी देशमुखवस्ती (अणदूर) येथे घडली. जखमींना नळदुर्ग येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात पहाटे दाखल करण्यात आले. अशोक सिद्राम जाधव (वय ४०) आणि सिध्दू सुखदेव अलकुंटे (वय ३५ दोघे राहणार देशमुख वस्ती) असे पहिल्या गटातील जखमीचे नावे आहेत. ते दोघे घराजवळ नातेवायकाचे भांडण सोडण्यासाठी गेले होते. त्यावेळी अमित चौगुले, नितीन चौगुले आणि इतर ८ जणांनी मिळून त्यांना कुऱ्हाड आणि दगडाने मारहाण केली. तर दुसऱ्या गटातील अर्चना पवार (रा.अणदूर) ही महिला जखमी झाली. त्याच कारणावरून अशोक जाधव त्याचा भाऊ रमेश जाधव आणि इतर तीन जणांनी मिळून मारहाण केली. अशा नोंदी सिव्हिल पोलीस चौकीत झाल्या आहेत.

अक्कलकोट येथे मुंबईच्या भाविकांचे दीड लाखाचे ब्रेसलेट पळवले

✔ सुराज्य/सोलापूर

मुंबईहून दर्शनासाठी आलेल्या एका भाविकांचे १ लाख ६६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे ब्रेसलेट चोरट्याने शिताफीने पळविले. ही घटना अक्कलकोट येथील स्वामी समर्थ मंदिरात बुधवारी रात्रीच्या सुमारास घडली. यासंदर्भात सुनील दत्तात्रय पावसकर (रा. प्रभादेवी, मुंबई) यांनी अक्कलकोट पोलिसात फिर्याद दाखल केली. ते बुधवारी सायंकाळी अक्कलकोट येथे मंदिरात दर्शनासाठी गेले होते. त्यावेळी गर्दीचा फायदा येऊन चोरट्याने त्यांच्या हातातील ४१ ग्रॅम वजनाचे ब्रेसलेट पळवले. असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. फौजदार मोरे पुढील तपास करीत आहेत.

अकोले येथे कंटेनरच्या धडकेने दुचाकी चालक ठार

✔ सुराज्य/सोलापूर

अकोले (ता.माढा) येथे वेगाने जाणाऱ्या कंटेनरच्या धडकेने दुचाकी वरील ४० वर्षीय इसम गंभीर जखमी होऊन मरण पावले. हा अपघात टेंभुर्णी ते पंढरपूर रोडवर बुधवारी दुपारच्या सुमारास घडला.

हरिदास विठ्ठल येवले (वय ४० रा.परिते) असे मयताचे नाव आहे. ते काल दुपारी ३ वाजेच्या सुमारास दुचाकीवरून टेंभुर्णी ते परिते असा प्रवास करीत होते. त्यावेळी टेंभुर्णी ते पंढरपूरच्या दिशेने जाणारा एमएच१२-एमव्ही-०३७३ या क्रमांकाचा कंटेनर पाठीमागून धडकल्याने ते मयत झाले. या अपघाताची नोंद टेंभुर्णी पोलिसात झाली.

तिसरा डोळा

– प्रकाश पोरे

तुमची एवढी लगबग कशा पायी?

कल्याण
167-45-690

मुंबई
125-87-359

राज्यातील निवासी डॉक्टर ७ फेब्रुवारीपासून संपावर

✔ **मुंबई** : राज्यातील निवासी डॉक्टरांचे मूलभूत प्रश्न असणारे मानधनवाढ, वसतिगृहांची दुरावस्था, प्रलंबित भत्ते या मागण्यांविषयी एक, दोन नव्हे तर तब्बल २८ वेळा पत्र पाठवूनही दाद न देणाऱ्या यंत्रणेविरोधात निवासी डॉक्टरांनी रोष व्यक्त केला आहे.

राज्यभरातील निवासी डॉक्टरांनी राज्य शासनाच्या या उदासीन भूमिकेविरोधात ७ फेब्रुवारीपासून बेमुदत संपावर जाण्याचा निर्णय घेतला आहे, त्यामुळे पुन्हा एकदा रुग्णसेवा ढासळण्याची शक्यता नाकारता येत नाही. या संपामध्ये राज्यातील सर्व शासकीय महाविद्यालयांमधील निवासी डॉक्टर सहभागी होणार

आहेत. निवासी डॉक्टरांची केंद्रीय संघटना मार्ड'ने यापूर्वीही वारंवार पाठपुरावा करून मागण्यांची पूर्तता होत नसल्याचे समोर आले आहे. प्रत्यक्षात केवळ तोंडी आश्वासनांवर या डॉक्टरांची समजूत घालण्यात आल्याचे दिसून आले आहे, दुसरीकडे हे मूलभूत प्रश्न अजूनही सुटले नाही. यापूर्वी हसन मुश्रीफ यांच्यासोबत ४ ऑक्टोबर २०२३ रोजी झालेल्या बैठकीनंतर त्यांनी या समस्या सोडवण्याचे तोंडी आश्वासन दिले, मात्र याची स्थिती ' जैसे थे ' आहे.

संभाजीराजे काँग्रेसच्या वाटेवर

✔ सुराज्य/कोल्हापूर

कोल्हापूर लोकसभा निवडणुकीसाठी इच्छुक असलेले माजी खासदार संभाजीराजे यांनी काँग्रेसच्या उमेदवारीसाठी चाचपणी सुरू केली आहे, याचाच एक भाग म्हणून त्यांनी मुंबईत काही नेत्यांशी चर्चा केली असून पक्षात प्रवेश केल्यास उमेदवारी देण्याचा शब्द त्यांना मिळाल्याचे समजते.

कोल्हापूर मतदार संघावर महाविकास आघाडीतील तीनही पक्षांनी दावा केला आहे. ज्याच्याकडे सक्षम उमेदवार त्याला जागा हे धोरण काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट व शिवसेना उद्धव ठाकरे गटाने घेतली आहे. सध्या या तीनही पक्षाकडे सक्षम उमेदवार नसल्याने तशा उमेदवाराचा शोध सुरू आहे. श्रीमंत शाहू महाराज यांनी नकार दिल्यानंतर सध्या संभाजीराजे यांच्याबाबत हालचाली सुरू आहेत.

स्वराज्य संघटनेचा महाविकास आघाडीत समावेश करून आघाडीची उमेदवारी घेण्याचा संभाजीराजेंचा प्रयत्न सुरू आहे. त्याचाच एक भाग म्हणून त्यांनी आघाडीच्या काही नेत्यांच्या भेटी घेतल्या. पक्षात प्रवेश करा मगच उमेदवारीचा

एका अटीवर शब्द मिळाला

विचार करू असा शब्द काँग्रेससह इतर पक्षाच्या काही नेत्यांनी त्यांना दिल्याचे समजते. यामुळे स्वराज्य संघटना आघाडीत विलीन करावे लागणार आहे. पक्ष प्रवेश केल्यास संघटनेचे अस्तित्व संपणार आहे. यामुळे संभाजीराजे कोणती भूमिका घेणार याची आता उत्सुकता आहे. शिवसेनेत प्रवेश केल्यास राज्यसभेला उमेदवारी देऊ असे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दीड वर्षापूर्वी सांगितले होते. पण, तेव्हा संभाजीराजेंनी नकार दिला. यामुळे राज्यसभेची संधी हुकली. आता पुन्हा उमेदवारीसाठी तशीच अट घालण्यात आली आहे. सध्याच्या परिस्थितीत कोल्हापूर लोकसभा मतदार संघात शिवसेना ठाकरे गट व राष्ट्रवादी शरद पवार गटापेक्षा काँग्रेसची ताकद अधिक आहे. यामुळे ते या पक्षाला प्राधान्य देण्याची शक्यता जास्त आहे.

सर्व पर्याय खुले... : महाविकास आघाडीतील तीन पैकी एका पक्षात प्रवेश केल्यास संभाजीराजे छत्रपती यांची उमेदवारी निश्चित असल्याचे सांगितले जाते आहे. संभाजीराजे छत्रपती राज्यसभेचे माजी खासदार आहेत.दरम्यान शिवसेनेचा उद्धव ठाकरे गट, काँग्रेस किंवा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट यापैकी एखाद्या पक्षात संभाजीराजेंनी प्रवेश केल्यास लोकसभेला उमेदवारी निश्चित अससल्याची माहिती समोर आली आहे. महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये याबाबत एकमत झाल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. यामुळे आता संभाजीराजे काय निर्णय घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे..